# भारत खरोखरीच सार्वभौम राष्ट्र आहे काय?

भारत एक सार्वभौम राष्ट्र आहे हे आपण कितीही ओरडून सांगितले तरी कोणीही आपल्याला सार्वभौम मानत नाही हे विदारक सत्य आहे. अमेरिका, ब्रिटन, चीन आपणाला शांत रहा असा उपदेश करतात परंतु, पाकिस्तान ला भारतात शांतता असावी असे मुळीच वाटत नाही. आणि ही राष्ट्रे आपणाला पाकिस्तानला जशास तसे उत्तर देण्यास अडथळा करतात व आपण निमुटपणे ऐकून घेतो. आपल्या हितांचे रक्षण करण्यास असमर्थ ठरतो. सद्य परिस्थितीत आपण मूठभर अतिरेक्याना वठणीवर आणू शकत नाही. म्हणजेच आपण परावलंबी आहोत. हे सत्य आपण स्वीकारले तर त्या मधून बाहेर पडण्याचा मार्ग सापडू शकतो.

आपल्याला मनन करावे लागेल. आपली शक्ति व मर्म स्थाने समजून घेतली पाहिजेत. आपल्या शक्तीचाच नव्हे तर मर्म स्थळांचा उपयोग आपल्या हितासाठी कसा करता येईल ते समजून घेतले पाहिजे. आपला स्वभाव, आपले कर्तृत्त्व व निसर्गाने दिलेली संपत्ती यांचा उपयोग करून आपण शक्ती प्राप्त करू शकतो. इतकी शक्ती की, आम्ही काय करावे हे सांगण्याची इतराना हिंम्मतच होणार नाही.

प्रथम आपल्याला बेरजेचे गणित शिकावे लागेल. भारतीय संस्कृती ही कोठल्याही धर्माची मक्तेदारी नाही, कोठल्याही जातीची नाही, कोठल्याही जातीची नाही, कोठल्याही वंशाची नाहीच नाही. ही आम्हा सर्व भारतीयांची आहे. हे पक्के समजून घेतले पाहिजे. येथे द्रविड आले, आर्य आले, शक कुशाण हूण आले. मुसलमान तसेच हबशी पण आले. सर्व येथलेच झाले. सर्वांच्या रीति रिवाजातून भारतीय संस्कृति निर्माण झाली. निरनिराळ्या समूहानी आपापली संस्कती जरूर जपली परंतु, इतराकडूनही बारेचसे रितीरिवाज घेतले. आताही तेच होत आहे. चेन्नईची इडली श्रीनगरला सहज उपलब्ध होते तर कोलकत्त्याचा रसगुल्ला कोठेही मिळू शकतो. ही प्रक्रिया चालूच आहे व चालतच राहणार अगदी कोणीही अडथळा निर्माण केला तरी. गुरूद्वारा स्वच्छ ठेवण्याकरता गर्भ श्रीमंतापासून गरिबापर्यंत सर्वच हाती झाडू घेतात. हे स्वीकातणे उणीदुणी काढण्यारेक्षा जास्त श्रेयस्कर नाही काय? एकमेकापासून अशा चांगल्या गोष्टी घेण्या ऐवजी कांही लोकांचा प्रयत्न असतो की, आमचेच रिवाज कसे श्रेष्ठ हे लोकाना सांगणे की, जेणेकरून वेगळेपणा जपला जाईल. त्यातून आपला गट निर्माण करून सर्वसामान्याच्या घामातून आपली उन्नती करून घेणे. अशा स्वार्थी लोकापासून सावध राहणे हे सगळ्यांचे कर्तव्य आहे. आणि हे स्वार्थी लोक कोठल्याही धर्माची मक्तेदारी नाही. अगदी सर्व धर्मात असे लोक सापडतील. बेरजेचे गणित त्याना अजिबात आवडत नाही. तसे झाले तर त्याना कोणिच भिक घालणार नाही. म्हणून ते वजाबकीचे गणित करतात आणि करत राहणार. त्यांच्यापासून सावधान.

द्वितीय वसा. आपली कार्यपद्धती बदलली पाहिजे. भगवान श्राकृष्णानी सांगितलेला कर्मयोगाचा अंगिकार सर्वानी केला पाहिजे. समाजात राहतो तर समाजाकरता मी माझे काम पूर्ण शक्तिनुसार व उत्तम कार्य पद्धत वापरून करीन याचा वसा सर्वानी घेतला पाहिजे. समाजाकरता वेगळे कांही करण्याची अजिबात आवश्यकता नाही. आणि जरूरी वाटली तर त्याकरता मूठभर लोक पुरेसे आहेत.

तृतिय वसा. मी विद्यार्थी आहे ही जाणीव. मनुष्य जन्मापासून मरेपर्यंत शिकतच असतो. शिक्षणातूनच त्याची उत्पादकता वाढते. कमी वेळात जास्त चांगल्या प्रकारे काम करू शकतो. आणि मी जे चांगले शिकलो ते इतराना शिकवीन. यातूनही मी समाजाचे ऋण फेडू शकतो हा विश्वास बाळगवावा. आपण कोठेही काम करत असलो, विद्यार्थी, सरकारी कर्मचारी, सार्वजनिक उपक्रम, खाजगी उद्योग अगदी कोठेही असलो तरी जे काय करतो ते स्वतः करता व देशहिता करताच आहे हा विश्वास आपल्या रक्तात भिनला पाहिजे. माझ्या पदाचा उपयोग इतराना मदत करण्या करता करीन, लोकाना त्रास देवून पैसे उकळण्या करता नाही ही भावना जोपासली पाहिजे. आपली राष्ट्राशी, समाजाशी, प्रदेशाशी, गांवाशी, कुटुंबाशी, कार्यालयाशी बांधिलकी असली पाहिजे.

बांधिलकी विषयी एक उत्तम अनुङव मला कांही वर्षापूर्वी आला. केरळ मध्ये आम्ही १५/२० प्रवाशी नौकानयन करत होतो. त्या मध्ये एक तरूण जर्मन जोडपे होते. मी फोटो काढत होतो. कॅमेरा बरोबर हाताळत नव्हतो. ते त्या जर्मन तरूणाने पाहिले व मदत करण्याची इच्छा प्रकट केली. त्याला नंतर मी तुम्ही कोण? भारत कसा वाटला? काय काम करता? वगैरे चौकशी केली. तेंव्हा कळले की, 'कोडॅक' मध्ये तो साधारण कर्मचारी आहे. त्याने त्याचे ओळखपत्रही दाखवले. मग सहज विचारले 'तुला माझी मदत करावी असे का वाटले?' त्याने मोठ्या अभिमावावे सांगितले 'आपण चुकीच्या पद्धतीने कॅमेरा हाताळल्यामुळे माझ्या कंपनीची नाचक्की होण्याची शक्यता होती, आणी माझी कंपनी जगात श्रेष्ठ आहे याची मला खात्री व अभिमान आहे' केपनी मध्ये तो कोणी मोठा अधिकारी नव्हता. तरी पण सुट्टीवर असताना सुद्धा त्याने आपली बांधिलकी उत्तम तऱ्हेने सिद्ध केली.

आपण प्रतिज्ञा करू या. मी बेरजेचे गणित करीन, माझे कार्य पूर्ण शक्तिनुसार व उत्तम कार्य पद्धत वापरून करीन, माझी कार्यपद्धत मी सतत शिक्षणातून सुधारत राहीन व माझ्या ज्ञानाचा फायदा जास्तीत जास्त लोकापर्यंत पोहचवीन. मग पहा. ना आपल्याला इंग्लंडच्या सहानुभुतीची गरज ना अमेरिकेच्या आशिर्वादाची, ना अतिरेक्या पासून भय ना शेजाऱ्याच्या आक्रमणाचे भिती. आणि आपण खरोखरीच सार्वभौम राष्ट्र म्हणून अभिमानाने मिरवू शकू.